वर्ष-०९ | अंक-२८ | मुंबई, मंगळवार ३० मे ते ०५ जून - २०२३ | पृष्ठ-४
मूल्य २/- रुपये
ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

# POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 सुपरफूड पोषण नव्हे, तर देतेय आजार:यातील व्हिटॅमिन-मिनरल्सच्या अधिक प्रमाणामुळे किडनी होतेय खराब : तज्ज्ञ

3 → परवडणाऱ्या घरांची अडथळ्यांची शर्यत!

कांदिवलीचा लालजी पाडा परिसर पुन्हा गोळीबाराने हादरला, 32 वर्षीय तरुणाचा मृत्यू ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

## नव-याचा बायकोकडे 'त्या' कारणासाठी तगादा, वाद अन् थेट बायकोचा खूनच




ठाणे: पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी नवरा व मृतक बायको दोघेही मूळचे बिहार राज्यातील आहेत. रोनीतराज आणि नीतू कुमारी यांचा विवाह २०११ साली झाला होता. त्यानंतर २०१६ साली आरोपी नवरा अंबरनाथमधील ऑर्डनन्स कंपनीत फिटर म्हणून नोकरीला लागला होता. हे जोडपे ऑर्डनन्स कंपनीच्या वसाहतीत राहत होते. लग्नाला 12 वर्षे झाली तरी देखील बायकोला मुलबाळ होत नसल्याने रोनीतराज तणावात होता. याच कारणावरून तो ...पान २ वर...

## तीस हजार द्या अन्यथा फोटो...; कीर्तनकारास धमकी देणा-या दोघांवर गुन्हा दाखल; छत्रपती संभाजीनगरमधील घटना

छत्रपती संभाजीनगरच्या एका वयोवृध्द कीर्तनकारास धमकी देणाऱ्या दोघांविरोधात शहरातील वाळूज पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मला 30 हजार रुपये द्या अन्यथा तुमचे फोटो इतरांना दाखवून समाजात तुमची बदनामी करीन, अशी धमकी कीर्तनकारास देण्यात आली होती. दरम्यान सततच्या या धमकीला कंटाळून कीर्तनकाराने पोलिसात धाव घेतली होती. त्यानंतर हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गंगापूर तालुक्यातील मांगेगाव येथील कीर्तनकार अंबादास गावंडे हे सध्या वाळूजला आपल्या कुटंबासह राहतात. तर मृदंगवादक ज्ञानेश्वर सुलाने (रा. बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर) यांच्या मध्यस्थीने कीर्तनकार गावंडे अनेक ठिकाणी कीर्तनातून प्रबोधन करण्याचे काम करतात. विशेष म्हणजे सुलानेबरोबर चांगल्या प्रकारचे ओळखीचे सबंध झाल्याने सदर कीर्तनकारांनी त्याला आपल्या घरीही अनेकवेळा आणलेले होते. अशातच 13 मे रोजी सुलाने यांनी मला वृंदावनला जायचे असल्याने अंबादास महाराज यांना 30 हजारांची मागणी केली. त्यावर कीर्तनकाराने नकार देताच त्याने माझ्याजवळ असलेले तुमचे फोटो मी इतरांना दाखवून तुमची समाजात बदनामी करील अशी धमकी दिली. दरम्यान त्यानंतर मांगेगाव येथेही जाऊन अशोक गावंडे यांच्या संगतीने पुन्हा 15 मे रोजी वरील प्रकारची धमकी दिल्याचे गावंडे यांनी सदर कीर्तनकाराला कळविले. गेल्या 15 मे पासून पैसे ...पान २ वर...

## महाविद्यालयीन युवतीकडून प्रियकराचा खून




पुणे: प्रियकराशी झालेल्या वादातून महाविद्यालयीन युवतीने त्याच्यावर स्वयंपाक घरातील सुरीने वार करुन खून केल्याची धक्कादायक घटना वाघोली परिसरात घडली. प्रियकराच्या खोलीत अभ्यासासाठी गेलेल्या युवतीचा वाद झाल्यानंतर तिने प्रियकरावर सुरीने वार केले. प्रियकराशी झालेल्या झटापटीत महाविद्यालयीन युवती जखमी झाली. यशवंत मुंडे (वय २२, मूळ रा. लातूर) असे खून झालेल्या प्रियकराचे नाव आहे. प्रेयसी अनुजा पन्हाळे (वय २१, रा. अहमदनगर) जखमी झाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, यशवंत आणि अनुजा वाघोली परिसरातील रायसोनी महाविद्यालयात विदा विज्ञान (डेटा सायन्स) अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षा त शिक्षण घेत आहे. परीक्षा सुरू असल्याने दोघे एकत्रित अभ्यास करायचे. ...पान २ वर...

## पुणे हादरलं! भाजी कापण्याच्या चाकूने प्रेयसीने केली प्रियकराची हत्या

पुण्यात मागील काही दिवसांपासून गुन्हेगारीत वाढ झाली आहे. त्यात प्रेमप्रकरणावरुन खूनाच्या घटनादेखील वाढ झाली आहे. पुणे जिल्ह्यातील वाघोलीत प्रेम प्रकरणातून प्रेयसीने प्रियकराचा खून केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. आज सकाळच्या सुमारास ही



घटना उघडकीस आली आहे. वाघोली परिसरात एका भाड्याच्या फ्लॅटमध्ये हे दोघेही मागील काही महिन्यांपासून राहत होते. दोघांमध्येही प्रेम संबंध होते. मात्र आज पहाटेच्या सुमारास रक्ताच्या थारोळयात प्रियकराचा मृतदेह सापडला आहे. यशवंत महेश मुंडे (वय 20) ...पान २ वर...

## मुंबईत आमदाराच्या घरात चोरी, चालकाने मित्राच्या मदतीने 25 लाख रुपये चोरले; 30 लाखांच्या खंडणीचीही मागणी

महाराष्ट्रातील नांदेडचे आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या घरातून 25 लाख रुपयांची चोरी झाली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार आमदार शिंदे यांच्या चालकाने त्याच्या मित्राच्या मदतीने ही चोरी केली. श्यामसुंदर शिंदे यांच्या मुंबईतील (Mumbai) घरात चोरीची घटना घडली. इतकंच नाही तर आरोपींनी त्यांच्याकडे 30 लाख रुपयांची खंडणी देखील मागितली



आहे. या प्रकरणी एन एम जोशी पोलीस स्टेशनमध्ये गुन्ह्याची नोंद झाली असून पोलिसांनी तपास सुरु केला आहे. आरोपींनी फोन करुन 30 लाख रुपयांची खंडणी मागितली श्यामसुंदर शिंदे यांचं मुंबईतील लोढा बॅलोसिमो को-ऑप हौसिंग सोसायटीमध्ये घर आहे. त्यांचा चालक चक्रधर पंडित मोरे याने मित्र अभिजीत ...पान २ वर...

## स्त्रीयांचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने बॅनर वरील फोटोंवर अश्लील शब्दात शिवीगाळ लिहून, चेहरे विद्रुप करून, स्त्री पुरुषांच्या लिंगाचे पेनाने चित्र काढून अपमानास्पद वागणुकीबाबत रेडीतील पाच आरोपींना सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून वेंगुर्ला पोलिसांनी केले अटक.

### सामाजिक कार्य करणा-या समस्त महिलांच्या अस्मितेला व आत्मसन्मानाला असे घाणेरडे कृत्य करून अटक आरोपींनी ठेच पोहोचविल्याचा संस्थेचा आरोप.

श्री क्षेत्र रेडी श्री गजानन देवस्थान येथे संप्रोक्षण कलशारोहण हा कार्यक्रम रविवार दिनांक २६ मार्च २०२३ ते २८ मार्च २०२३ रोजी पर्यंत रेडीच्या स्वयंभू द्विभुज श्री गणपती मंदिरात करण्यात आला होता. या कार्यक्रमास महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा व इतर राज्यातील येणाऱ्या श्री.गणेश भक्तांचे हार्दिक स्वागत करून त्यांना शुभेच्छा देण्याकरिता अखिल भारतीय भंडारी महासंघ, भारतीय भ्रष्टाचार निवारण संस्था व L B N न्यूज या संस्थेच्या व समाजाच्या माध्यमातून रेडी म्हारतळे येथे रस्त्याच्या कडेला बॅनर लावण्यात आला होता. त्या बॅनरवर स्वयंभू गणपती व ग्रामदेवता स्वयंभू श्री देवी माऊली यांच्या फोटोसह संस्थेच्या महिला व पुरुष पदाधिकाऱ्यांचे नावासह फोटो लावण्यात आले होते. दिनांक २९ मार्च २०२३ रोजी रात्री १२.३० च्या सुमारास काही अज्ञात इसमांनी संगनमताने त्या बॅनरची लाकडी फ्रेम तोडून बॅनर फाडून त्यावरील महिलांच्या फोटोंवर स्त्रीयांचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने बॅनरवर अश्लील शब्दात शिवीगाळी लिहून, स्त्री पुरुषांच्या लिंगाचे पेनाने चित्र काढून, पदाधिकाऱ्यांचे चेहरे विद्रुप करून शिरोडा मिठागर येथे रात्री अज्ञातांनी नेवून लावला होता. या गंभीर व किळसवाण्या प्रकरणाची तक्रार संस्थेचे पदाधिकारी व गावातील ग्रामस्थांनी सह्याचे तक्रार निवेदन पोलीस निरीक्षक वेंगुर्ला यांना दिनांक ४ एप्रिल रोजी दिले होते. सदर तक्रारीवरून वेंगुर्ला पोलीस ठाण्यात गुन्हा क्र.५८/२०२३, कलम ५०९,४२७ भादंवि अन्वये नोंद करून त्याचा पुढील तपास हा वेंगुर्ला पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शेखर दाभोळकर यांना वर्ग करण्यात आला. सदर गुन्हा हा गावात रात्रीचा घडला असल्याने सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून गुन्ह्याचा अधिक तपास करीत असतांना अज्ञात इसम हे गावातील असल्याची माहिती मिळाल्याप्रमाणे फुटेज मधील दुचाकीवरून बॅनर घेऊन जाणाऱ्या आरोपींच्या स्पेल्डर गाडीची ओळख पटवून आतापर्यंत गुन्ह्यात पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यात आरोपी स्वप्नील विजय राणे, रा.रेडी हुडावाडी, चंद्रकांत यशवंत राणे, रा. रेडी हुडावाडी, तुकाराम प्रल्हाद सावंत, रा. रेडी गावतळे, राहूल लक्ष्मीकांत राणे, रा.रेडी हुडावाडी, देवेश दशरथ राणे, रा. रेडी हुडावाडी यांना अटक करण्यात आली असून त्यांचेकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेली दुचाकी एक्ससिस १२५ क्र. एमएच-०७-एके- ८३२५ व स्प्लेनडर मो.सायकल क्र. एमएच-०७-एपी-५३५० या दोन गाड्या हस्तगत करण्यात आल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक दाभोळकर यांनी दिली. सदर गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक शेखर दाभोळकर करीत असून गुन्ह्यातील संस्थेचे पदाधिकारी व साक्षीदार असलेले राजन रेडकर, भूषण मांजरेकर ...पान २ वर...

## स्पॅनिश पर्यटक महिलेचा विनयभंग करणा-या मॅनेजरला दोन वर्षांचा कारावास

मुंबई: भायखळा पूर्वेकडील वेलकम गेस्ट हाऊसमध्ये २७ मार्चच्या रात्री ही घटना घडली होती. ३८ वर्षीय स्पॅनिश महिला पर्यटक या गेस्ट हाऊसमध्ये राहण्यासाठी आली. रात्रीच्या वेळी गेस्टहाऊसचा मॅनेजर रियाजने तिच्या एकटेपणाचा फायदा घेत सुरुवातीला मदत करण्याच्या बहाण्याने तिच्या रुममध्ये प्रवेश केला. त्यानंतर त्याने वारंवार सेल्फी काढण्याचा बहाणा करून तिचा विनयभंग केला. अखेर पीडित महिलेने याबाबत पोलिसांत तक्रार दिली. पोलिसांना स्पॅनिश कळत नव्हती पण..: तक्रारदार महिलेला स्पॅनिश व्यतिरिक्त इतर कोणतीही भाषा येत नसल्याने पोलिसांनी गेस्ट हाउसमधील



स्पॅनिश भाषा येणाऱ्या विदेशी नागरिकाची मदत घेतली. यानंतर गुगल ट्रान्सलेटरचा वापर करून महिलेशी संवाद साधला. विनयभंगाचे प्रकरण समोर येताच भायखळा पोलिसांनी आरोपी रियाजविरुद्ध २७ तारखेला गुन्हा दाखल केला. मूळच्या उत्तर प्रदेशमधील रहिवासी असलेल्या रियाजने पळून जाण्याचा प्रयत्न केला; मात्र भायखळा पोलिसांनी शोध घेत त्याला बेड्या ठोकल्या. पोलिसांची तत्परता आली कामी: विदेशी महिला पर्यटकासोबत ही घटना घडली असल्याने पोलीस उपायुक्त अकबर पठाण यांनी तातडीने कठोर पावले उचलली. यांच्या ...पान २ वर...

## झोमॅटो बॉय डिलिव्हरीच्या नावाखाली रस्त्यावर करायचा मोबाईल चोरी, टिळकनगर पोलिसांकडून आरोपीला बेड्या

हॉटेलमधील जेवणाच्या पार्सलची डिलिव्हरी करत रस्त्याने मोबाईल फोनची चोरी करणाऱ्या एका झोमेटो (Zomato) डिलिव्हरी बॉयला (Delivery Boy) मुंबईतील टिळकनगर पोलिसांनी गजाआड केलं आहे. नदीम नसीम अख्तर खान असे या चोरट्या झोमॅटो डिलिव्हरी बॉयचे नाव आहे. 24 मे रोजी नदीम नसीम अख्तर खानने एका रस्त्यावरुन जाणाऱ्या एका महिलेचा आयफोन (iPhone) खेचून पळ काढला होता. यानंतर महिलेने टिळकनगर पोलीस स्टेशन गाठून या प्रकरणी तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची नोंद घेत पोलिसांनी तपास सुरु केला. सीसीटीव्ही फूटेजच्या माध्यमातून त्याचा शोध घेतला आणि त्याला बेड्या ठोकल्या. काय आहे प्रकरण? झोमॅटोचा आरोपी डिलिव्हरी बॉय नदीम नसीम अख्तर खान हा



जेवणाची डिलिव्हरी करता करता रस्त्यावरुन जाणाऱ्या लोकांचे मोबाईल फोन हिसकावून घेऊन पळ काढायचा. अशाच प्रकारची चोरी त्याने 24 मे रोजी केली. परंतु त्याच्या या चोरीमुळे त्याला गजाआड व्हावं लागलं. पल्लवी भन्साळी नावाची महिला 24 मे रोजी एमजी रोडवरुन जात होती. याचवेळी या झोमॅटो डिलिव्हरी बॉयने त्यांचा हातातील आयफोन खेचून घेऊन पळ काढला होता. या महिलेने टिळकनगर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली. या प्रकरणी गुन्हा दाखल होताच टिळकनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील काळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने या चोराचा शोध सुरु केला. पोलिसांनी आरोपी डिलिव्हरी बॉयला कसं शोधलं? घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करुन आरोपी ज्या मार्गा नेगेलेला आहे त्या मार्गा वरील दुकानांचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी केली. यादरम्यान आरोपी डिलिव्हरी बॉय गोवंडी इथल्या हायपर किचन या हॉटेलच्या ठिकाणी एक पार्सल घेऊन जात असताना दिसून आला. तेव्हा तेवढ्या वेळात किती पार्सलची डिलिव्हरी, कोणामार्फत झाली याचा तपास केला असता चार संशयित इसमांची नावे समोर आली. त्यामधील सर्वांची फेसबुक, व्हाट्सअ‍ॅप प्रोफाईल तपासणी केली असता नदीम खान याचा प्रोफाइल फोटो जुळून आला. त्यानंतर त्याच्या मोबाईल क्रमांकाचे लोकेशन प्राप्त करुन त्याला गोवंडी इथून ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केली असता त्याने हा गुन्हा कबूल केला. तसंच त्याच्याकडून पंतनगर आणि ...पान २ वर...

## ड्रीम 11वर लाख रुपए जिंकले म्हणत तरुणाला गंडा; एका झटक्यात गेले 59 हजार

सध्या आयपीएल (I P L) सुरु असल्याने ऑनलाईन टीम लावून त्यातून पैस जिंकण्यासाठी तरुण अनेक ॲप डाऊनलोड करून संघ लावतायत. मात्र काही सायबर भामटे अशा लोकांना गंडा घालत आर्थिक फसवणूक करताना पाहायला मिळत आहे. दरम्यान, असाच काही प्रकार बीड जिल्हात (Beed District) समोर आला आहे. आयपीएलच्या क्रिकेट सामन्यात आपण ड्रीम 11 वर लावलेली टीम अचूक ठरली असून, आपण 1 लाख रूपये जिंकले आहेत. त्याची काही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आपण थोडे पैसे पाठवा, असे म्हणत तब्बल 59 हजार रूपयांना एका विद्यार्थ्या लासायबर भामट्यांनी चुना लावला. ही घटना बीड तालुक्यातील एका गावात घडली असून, सायबर पोलिसांकडे अर्ज देण्यात आला आहे.




प्राथमिक माहितीनुसार, बीड तालुक्यातील एक विद्यार्थी दररोज आयपीएल मॅच सुरू असताना ड्रीम 11 वर टीम लावत होता. दरम्यान अनेकदा त्याला त्यातून त्याला पैसे देखील मिळत होते. 9 मे रोजी त्याला एका अनोळखी मोबाइल नंबरवरून फोन आला. आयपीएलच्या क्रिकेट सामन्यात आपण ड्रीम 11 वर लावलेली टीम अचूक ठरली असून, तुम्ही एक लाख रूपये जिंकलात, असे म्हणून विद्यार्थ्यांचा विश्वास जिंकला. त्यानंतर त्याच्यासोबत व्हॉट्सअ‍ॅपवर चॅटिंग केली. त्यामुळे तरुणाचा विश्वास बसला. आपण एक लाख रुपये जिंकले असल्याचा देखील विश्वास बसला. तुम्ही जिंकलेले पैसे तुम्हाला पाठवितो, परंतु त्यासाठी काही प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. यासाठी विद्यार्थ्यांकडून दोन दिवसांत 59 हजार 348 रूपये घेतले. आणखी 10 हजार रुपये मागितल्यावर विद्यार्थ्या ला संशय आला. त्याने दिलेले सर्व पैसे मागितल्यावर समोरच्या भामट्याने फोन बंद केला. वारंवार संपर्क करूनही फोन न लागल्याने त्याने थेट सायबर पोलीस ठाणे गाठत तक्रार दिली. पोलिसांनीही लगेच बँक आणि संबंधित यंत्रणेला पत्र पाठवून पैसे परत मिळवून देण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. काळजी घावी... आयपीएलच्या क्रिकेट सामन्यात ॲपवरून पैसे लावून, टीम लावणारे अनेक ॲप सध्या उपलब्ध आहेत. अनेक तरुण यावर टीम लावतात. मात्र हीच बाब लक्षात घेत सायबर भामटे अनेकांची फसवणूक करत आहेत. तुम्ही लावलेली टीम जिंकली असून, ...पान २ वर...

# पोलीस बातमी पत्र

मुंबई

२

मुंबई, मंगळवार ३० मे ते ०५ जून - २०२३


## सुपरफूड पोषण नव्हे, तर देतेय आजार:यातील व्हिटॅमिन-मिनरल्सच्या अधिक प्रमाणामुळे किडनी होतेय खराब : तज्ज्ञ



ॲथलिटिक ग्रीन्स, डेली ग्रीन्स, सुपर ग्रीन्स, ग्रीन पावडर यासारख्या असंख्य सुपरफूडच्या जाहिराती सोशल मीडिया आणि वेबसाइटवर मोठ्या प्रमाणात आहेत. फक्त एक स्कूप पाण्यात मिसळून ते घ्या, दिवसभराचे पोषक घटक त्यातून मिळतील, असा दावा केला जात आहे. तणाव कमी होणे, प्रतिकारशक्ती वाढणे, पचनक्रियेत सुधारणा आणि प्रचंड ऊर्जा या सुपरफूडने मिळते, असाही दावा केला जात आहे. तज्ज्ञांनी मात्र हे दावे फेटाळले आहेत. न्यूयॉर्क यूनिव्हर्सिटीतील फूड स्टडीज आणि सार्व जनिक आरोग्याच्या तज्ज्ञ डॉ. मॅरियन नेस्ले सांगतात, ही उत्पादने लोकांना फक्त आकर्षित करतात. तुम्हाला वाटते का की हे एवढे सोपे आहे? चांगल्या आरोग्यासाठी पोषणाशी संबंधित आहाराची एक स्कूपपेक्षा खूप अधिक गरज असते. साधारणपणे या सुपरफूड्समध्ये व्हिटामिन ई आणि सी (ॲंटिऑक्सिडंट), बायोटिन (चयापचयात साह्यकारी - व्हिटॅमिन बी ७), व्हिटॅमिन बी १२ (रक्त आणि मज्जातंतू धारासाठी) आणि मिनरल्स असतात. काहींमध्ये प्लँट प्रोटीन (मटार प्रोटीन किंवा ब्राऊन राइस प्रोटीन पावडर) पालक आणि ब्रोकोलीसारख्या भाज्यांचे पावडर असते. काही ॲडप्टोजेन (तणाव कमी करण्यात साह्यकारी) जसे` अश्वगंधा, रेशी मशरूम, जिनसेंग आणि रोडियोला, प्रचंड ऊर्जा देण्यासह विविध आजारांसाठी उपयुक्त समजले जातात. सिंहपर्णीच्या मुळी, गुलाबाचे फळ आणि काटेरी दूध फुले पोटाचे आरोग्य चांगले ठेवतात, असा दावा केला जातो. मात्र हे फक्त दावेच आहेत. अमेरिकी एफडीएनेही याचे मूल्यांकन केलेले नाही. त्यामुळे त्यांच्यापासून होणाऱ्या फायद्यांबाबतही शंका आहे. हार्व र्ड मेडिकल स्कूलचे डॉ. पीटर कोहेन सांगतात,'संतुलित आहार घेत असाल तर अशा सप्लिमेंटची गरज नाही.' डॉ. नेस्ले सांगतात, की ब्रोकोली किंवा पालकसारख्या भाज्या पावडर रूपात दिल्याने काही व्हिटॅमिन आणि आवश्यक पोषक घटक नष्ट होतात. त्या मूळ स्वरूपात खाल्ल्यास फायदा होऊ शकतो. तरीही पावडर घ्यायचे असेल तर काही अडचण नाही, मात्र त्यापासून फायदा तर होणारच नाही. यांच्या प्रभावावर कोणतीही क्लिनिकल चाचणी नाही, हानीदेखील शक्य आहे : तज्ज्ञ बहुतेक सुपरफूड पावडरमध्ये दैनंदिन गरजेपेक्षा जास्त जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात. उदाहरणार्थ, यूएसमध्ये उपलब्ध असलेल्या एजी-१ ग्रीन पावडरमध्ये शिफारस केलेल्या दैनंदिन प्रमाणापेक्षा ५५०% अधिक व्हिटॅमिन ई आणि ११००% अधिक बायोटिन आहे. जॉन्स हॉपकिन्स येथील गॅस्ट्रो तज्ज्ञ गेराई मुलिन म्हणतात, 'शरीर बहुतेक पोषक घटक हाताळू शकते, परंतु काही प्रक्रिया करताना मूत्रपिंड खराब होऊ शकतात. अ, ड आणि ई जीवनसत्त्वांचा अतिरेक देखील हानिकारक आहे. त्यांच्या प्रभावाबाबत कोणत्याही क्लिनिकल चाचण्या झाल्या नाहीत. म्हणजेच भावनांचा गैरफायदा घेण्याशिवाय हे सर्व काही नाही.

## वेदनादायी संगीत, गाण्यांमुळे सुंदर आठवणींना उजाळा; नकारात्मक भावना घटतात, दुःखी नसतानाही अश्रू अनावर, मन होते मोकळे



लोक वेदनाप्रधान वा उदास, नैराश्यांनी भरलेली गाणी का ऐकतात? नैराश्याने भरलेले संगीत आणि गाणी आणखी दुःखी करतात असे आतापर्यंत मानले जात होते. मात्र त्यामुळे आपल्या सुंदर आठवणींना उजाळा मिळत असल्याचे एका संशोधनात आढळले आहे. खऱ्या आयुष्यात आपण निराश होऊ इच्छित नाही. मात्र संगीताच्या माध्यमातून त्या भावनेची अनुभूती घ्यायला आपल्याला आवडते. शोधकर्ते आणि येल युनिव्हर्सिटीचे मनोचिकित्सक डॉक्टर जोशुआ नोब सांगतात की, लोकांच्या मेंदूत एकाच वेळी एखाद्या गोष्टीसाठी दोन भावना तयार होतात. एक यथार्थ आणि दुसरी आभासी. उदास गाण्यांबाबतही असेच घडते. ही गाणे आठवणींच्या सागरात डुंबवतात, मात्र उदास करत नाहीत. डॉक्टर नोब आणि त्यांची माजी विद्यार्थिनी व कॉग्नेटिव्ह वैज्ञानिक तारा व्यंकटेशन यांनी उदास गाण्यांवर हे संशोधन केले आहे. जर्नल ऑफ ॲस्थेटिक एज्युकेशनमध्ये ते प्रकाशित झाले आहे. उदास गाणी नकारात्मक भावनांमधून बाहेर काढण्यास मदत करतात. भावना व्यक्त करणे, तणाव कमी करण्याबरोबर एकटेपणात साथसंगत करतात. 'उदास संगीत आपल्याला परिस्थितीची खरी ओळख करून देते. आपण जे अनुभवत आहोत त्यात काहीच चुकीचे नाही, हा विश्वास दुःखाने भरलेले संगीत आपल्याला देते,असे संशोधनात दिसून आले. दुःखाची स्थिती आणखी वाढण्याला पायबंद बसतो : जाणकार डॉ. नॉब म्हणतात,'उदास संगीत आवडण्यामागे अनेक शास्त्रीय कंगोरे आहेत. दुःख, उदास भावना वा तणावाच्या स्थितीत दुःखाची भावना दर्शवणारे संगीतामुळे प्रोलेक्टिन हार्मोन रिलीज होते. त्यामुळे आपल्या वेदना कमी करण्यात ते महत्त्वाची भूमिका बजावते. मानसिक दबावाच्या स्थितीत प्रोलेक्टिन दिलासा, स्थिरपणाची भावना निर्मा ण करते त्यामुळे दुःखद परिस्थिती वाढण्याला पायबंद बसतो. अनेक लोक केवळ भावना दाटून आल्यानंतरही दुःखाने भरलेले संगीत ऐकतात. त्यामुळे त्यांना हलके वाटते.'

## आरोग्य टिप्स:हिंगामुळे कान आणि दातदुखीपासून मिळेल आराम, पचन किंवा गॅसशी संबंधित समस्या होतील दूर

आयुर्वेदानुसार पचन किंवा गॅसशी संबंधित समस्या असल्यास गरम पाण्यात चिमूटभर हिंग टाकून प्यायल्याने आराम मिळतो. म्हणूनच लहान मुलांच्या नाभीमध्ये हिंग-पाणी लावले जाते, जेणेकरून लहान मुलाने प्यालेले दूध सहज पचते आणि त्याला पोटदुखीचा त्रास होत नाही. नॅशनल सेंटर फॉर बायोटेक्नॉलॉजी इन्फॉर्मेशन (NCBI) च्या संशोधनातही असे म्हटले आहे. संशोधन असे सूचित करते की, हिंगामध्ये पाचक उत्तेजक घटक असतात, जे लाळ आणि लाळ अमायलेस सारख्या एंजाइम सक्रिय करतात. डाळ किंवा भाज्यांमध्ये चिमूटभर हिंगाचा वापर जेवणाची चव वाढवण्यासाठी आणि पचनशक्ती लक्षात घेऊन केला जातो. बापू नेचर क्युअरच्या आयुर्वेदाचार्य डॉ. रश्मी चतुर्वेदी सांगतात की, आयुर्वेदात हिंगाचे पाणी अनेक समस्यांवर फायदेशीर मानले जाते. कानदुखी, दातांमधील पोकळी आणि रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यासाठीही हिंगाचे पाणी फायदेशीर आहे. वजन कमी करण्यासाठी हिंग गुणकारी डॉ. रश्मी चतुर्वेदी यांच्या मते, हिंगामध्ये चयापचय क्रिया सक्रिय करणारे घटक असतात. चयापचय वाढवण्यासाठी कोमट पाण्यात हिंग मिसळून प्या. याशिवाय हिंगामध्ये लठ्ठपणाविरोधी घटक असतात.




हिंगाच्या पाण्यामुळे चरबी जाळण्यास मदत होते, त्यामुळे वजन सहज नियंत्रित करता येते. कानदुखी आणि दातांच्या पोकळीपासून आराम मिळतो हिंगामध्ये ॲंटी-व्हायरल आणि ॲंटी-इन्फेक्शन गुणधर्म आढळतात, ज्यामुळे कान दुखण्यात आराम मिळतो. यासाठी दोन चमचे खोबरेल तेलात चिमूटभर हिंग टाकून मंद आचेवर गरम करा. कोमट झाल्यावर त्याचे काही थेंब कानात टाका, वेदना कमी होतील. दातांच्या पोकळीमुळे किंवा दुखण्याने त्रास होत असल्यास हिरड्यांभोवती चिमूटभर हिंग लावा. हा उपाय दिवसातून 2 ते 3 वेळा केल्याने दुखण्यात आराम मिळेल.डोकेदुखी आणि मायग्रेनपासून मुक्त व्हा डोकेदुखी किंवा मायग्रेनचा त्रास होत असेल तर एक ते दोन कप पाणी मंद आचेवर गरम करा. आता त्यात चिमूटभर हिंग टाका आणि 10-15 मिनिटे गरम होऊ द्या. पाण्याचे प्रमाण थोडे कमी झाले की गॅस बंद करा. हे पाणी दिवसातून ३ ते ४ वेळा प्या. गुलाबपाण्यात हिंग मिसळून त्याची पेस्ट तयार करून कपाळावर लावल्यानेही दुखण्यात आराम मिळेल.

मासिक पाळीच्या असह्य वेदनांमध्ये हिंगाचे पाणी प्या डिसमेनोरिया म्हणजेच मासिक पाळीच्या तीव्र वेदनांवर हिंग गुणकारी आहे.

### पुणे हादरलं ! भाजी कापण्याच्या

असे खून झालेल्या प्रियकराचे नाव आहे. घटनेची माहिती मिळताच लोणीकंद पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. संबंधित प्रेयसीने घरातील भाजी कापण्याच्या चाकूने प्रियकरावर वार केल्याचे दिसून आले. प्रियकराला तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. मात्र त्याआधीच त्याचा मृत्यू झाला होता. संबंधित प्रेयसीही यामध्ये जखमी झाली आहे. लोणीकंद पोलिसांनी याप्रकरणी शवविच्छेदनासाठी मृतदेह पाठवला आहे. याप्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. प्रियकर आणि प्रेयसी दोघेही काही दिवसांपासून वाघोली परिसरात भाड्याच्या खोलीत रहात होते. दोघांमध्ये प्रेमसंबंध असल्याने दोघेही एकत्र राहत होते. त्या दोघांच्या भांडणात प्रेयसीही जखमी झाली असल्याचे सांगण्यात आले आहे. वाद झाल्याने खून केल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास सुरु आहे. हा सगळा वाद नेमका कशामुळे झाला, याचे कारण अद्याप समोर आलेली नाही. पुण्यात खुनांच्या प्रकरणात वाढ

पुण्यात गुन्हेगारी वाढत असल्याचं अनेक घटनांमधून समोर येत आहे. त्यातच कालच पुण्यातील भोसरी परिसरात एका 24 वर्षीय तरुणाने आपल्या मित्राची परवानगी न घेता खिशातून मोबाईल काढून घेतल्याने त्याची दगडाने ठेचून हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली होती. नारायण वाघमारे असे हत्या केलेल्याचं नाव असून अमर उर्फ अक्क्या गौतम कसबे (वय 24 वर्षे, रा. यशवंत नगर, सेक्टर 7, एमआयडीसी, भोसरी, पुणे) असं आरोपीचं नाव आहे. त्याला पोलिसांनी अटक केली होती. वाघमारे याने कसबे यांच्या खिशातून मोबाईल फोन त्यांच्या परवानगीशिवाय काढून घेतला, याचा राग येऊन आरोपी कसबे याने वाघमारेचं डोके दगडाने ठेचून त्याची हत्या केली आहे.

### महाविद्यालयीन युवतीकडून प्रियकराचा खून

यशवंत रायसोनी महाविद्यालयाजवळ भाडेतत्वावर खोली घेऊन राहत होता. रविवारी रात्री अनुजा त्याच्या खोलीवर अभ्यास करण्यासाठी गेली होती. सोमवारी पहाटे यशवंत आणि अनुजा यांच्यात वाद झाला. त्या वेळी तिने स्वयंपाकघरातील भाजी कापण्याच्या सुरीने यशवंतवर सुरीने वार केले. झटापटीत अनुजाला दुखापत झाली. गंभीर जखमी झालेल्या यशवंतला खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता. या घटनेची माहिती मिळताच लोणीकंद पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन पवार यांनी घटनास्थळी धाव घेतली.

### मुंबईत आमदाराच्या घरात चोरी,

कदमसह चोरी केली. 1 एप्रिल ते 28 एप्रिल दरम्यान दोघांनी चोरी केली. आमदार शिंदे यांच्या घरातून तब्बल 25 लाख रुपयांची चोरी केली. एवढंच नाही तर फोन करुन श्यामसुंदर शिंदे यांच्याकडे 30 लाख रुपयांची मागणी केली. जर 1 जूनपर्यंत पैसे मिळाले नाही तर रायगडला जाऊन स्वतःला इजा करुन घेईन आणि सोशल मीडियावर तुमची बदनामी करेन, अशी धमकी आरोपीने आमदार शिंदे यांना दिली. चालक आणि मित्राविरोधात पोलिसात तक्रार यानंतर श्यामसुंदर शिंदे यांच्या स्वीय सहाय्यकाने एन एम जोशी पोलीस स्टेशनमध्ये चालक चक्रधर पंडित मोरे आणि त्याचा मित्र अभिजीत कदम यांच्याविरोधात तक्रार दाखल केली. पोलिसांनी या प्रकरणात गुन्हा दाखल केला असून तपासाला सुरुवात केली आहे. आरोपी चालक आणि त्याच्या मित्राचा शोध पोलीस घेत आहेत. दरम्यान चोरीच्या या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. कोण आहेत श्यामसुंदर शिंदे? श्यामसुंदर शिंदे हे नांदेडमधील लोहा-कंधार मतदारसंघाचे (L o h a K a n d h a r Constituency) आमदार आहेत. 2019 च्या निवडणुकीत लोहा मतदारसंघात शेकापतर्फे निवडून आलेले शिंदे हे या पक्षाचे विधानसभेतील एकमेव आमदार आहेत. शेकापतर्फे निवडून आल्यावर सुरुवातीला त्यांनी भाजपचे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांना समर्थन दिलं होतं. नंतर महाविकास आघाडीचे सरकार स्थापन होत असताना त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून महाविकास आघाडीमध्ये प्रवेश केला. अडीच वर्षे महाविकास आघाडीसोबत राहिल्यानंतर त्यांनी आघाडीला सोडचिठ्ठी देत भाजपशी घरोबा केला.

### नव-याचा बायकोकडे 'त्या'

बायकोच्या चारित्र्यावर संशय घेत तिच्याशी वाद घालायचा. रविवारी (28 मे) रोजी दोघात वाद झाला होता. त्यावेळी दारूच्या नशेत असलेला आरोपी नवरा रोनीतराज मंडल याने बायको नीतू कुमारी हिला मारहाण करून खून केला. खूनाचा रचला बनावः बायकोचा घरात खून केल्यानंतर आरोपी नवऱ्याची घाबरगुंडी उडाली. यानंतर रविवारी सायंकाळच्या सुमारास त्याने शेजाऱ्यांना बोलावले आणि माझ्या बायकोला कोणीतरी ठार मारले असे सांगत खूनाचा बनाव रचला. दरम्यान घटनेची माहिती अंबरनाथ पोलिसांना मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेहाचा पंचनामा केला. यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात रवाना करून तपासाला सुरुवात केली. उलटचौकशीत बिंग फुटले: दुसरीकडे नवरा रोनीतराज हा सांगत असलेल्या गोष्टींवर पोलिसांना संशय आला. त्यानंतर पोलिसांनी त्यालाच ताब्यात घेत उलट चौकशी सुरू केली. यामध्ये त्याचा बनाव उघडकीस आला आणि आपणच बायकोचा खून केल्याची त्याने पोलिसांना कबुली दिली. त्यानंतर आरोपी नवऱ्यावर खुनाचा गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली.आरोपीला पोलीस कोठडी: आज आरोपी नवऱ्याला उल्हासनगर न्यायालयात हजर केले असता त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली गेली; मात्र केंद्र सरकारची कंपनी असलेल्या ऑर्डनन्स कंपनीच्या वसाहतीत घडलेल्या या खूनाच्या घटनेने परिसरात मोठी खळबळ माजली आहे.

### स्पॅनिश पर्यटक महिलेचा विनयभंग

मार्गदर्शनाखाली भायखळा पोलीस ठाण्याचे वपोनि अशोक खोत, पोनि चिमाजी आढाव यांच्या नेतृत्वात तपास अधिकारी पोलीस उप निरीक्षक आसीफ पठाण यांनी अवघ्या २४ तासांत गुन्ह्याचा तपास पूर्ण केला. यानंतर पोलिसांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सोबतच न्यायालयाला विनंती करून त्याच दिवशी पीडित महिला पर्यटक आणि विदेशी साक्षीदार यांची न्यायालयासमोर साक्ष नोंदवून घेतली. पुढे, दोन महिन्यात साक्षीदार आणि भक्कम पुरावे सादर केले. न्यायालयाने सुनावली 'ही' शिक्षा: माझगाव येथील २५व्या महानगर दंडाधिकारी न्यायालयासमोर चाललेल्या या खटल्यात न्यायालयाने २६ मे रोजी निकाल दिला. यात न्यायालयाने आरोपी रियाजला दोन वर्षे कैद आणि पाच हजार रुपयांचा दंड किंवा तीन महिने कैद अशी शिक्षा सुनावली आहे. पोलिसांच्यावतीने सरकारी अभियोक्ता एस. एस. कावळे यांनी युक्तिवाद केला. तर, कोर्ट पोलीस अंमलदार थोरात, निलेश घाडगे आणि प्रियंका थोरात यांनी न्यायालयीन कामकाज पार पाडले.

### तीस हजार द्या अन्यथा फोटो.

दे अन्यथा बदनामी करील अशी सुलाने सतत धमकी देत होता. तसेच त्यांचे कोणते फोटो आहेत हे किर्तनकारालाही माहिती नाही. त्यामुळे त्रास असहय्य झाल्याने अखेर कीर्तनकार अंबादास मारुती गावंडे यांनी ज्ञानेश्वर सुलाने (रा.सासेगाव, ता. कन्नड ह. मु. बजाजनगर) अशोक बारकु गावंडे ( रा. मांगेगाव ) या दोघाच्या विरोधात वाळूज पोलिस ठाण्यात फिर्या द दिली. त्यावरून पोलिसांनी वरील दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. 'तो' फोटो कोणता? मला 30 हजार रुपये द्या अन्यथा तुमचे फोटो इतरांना दाखवून समाजात तुमची बदनामी करीन, अशी धमकी कीर्तनकारास देण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. दरम्यान यामुळे तो फोटो नेमका कोणाचा आणि त्यात काय आहे अशी देखील चर्चा यामुळे होऊ लागली आहे. तर या फोटोबाबत आपल्याला देखील काहीही माहित नसल्याचं कीर्तनकार यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. त्यामुळे पोलीस तपासातच या सर्व गोष्टी स्पष्ट होणार आहे.

### स्त्रीयांचा विनयभंग करण्याच्या

, आशिष सुभेदार, अरुण कांबळी, रविंद्र राणे, आबा चिपकार, दयानंद कृष्णाजी, राजेश सातोसकर, सौरभ नागोळकर, दिलीप साळगावकर, मुरलीधर राऊळ व इतर पदाधिकारी सदस्य व महिला यांनी सदर गुन्ह्यातील अटक आरोपींना हा कट रचून हे कृत्य करण्यास भाग पाडले त्यामागील प्रमुख सूत्रधार असणाऱ्या पाहिजे आरोपींना लवकरात लवकर अटक करण्याची मागणी वेंगुर्ला पोलीस निरीक्षक यांना लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे. गुन्ह्यातील अटक आरोपींनी असे जाणीवपूर्व क घाणेरडे कृत्य करून स्त्रीयांचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने बॅनर वरील फोटोंवर अश्लील शब्दात शिवीगाळ लिहून, पदाधिकाऱ्यांच्या चेहेऱ्याचे पेनाने विद्रुपीकरण करून, फोटोंवर स्त्री पुरुषांच्या लिंगाचे पेनाने चित्र काढून, संस्थेच्या माध्यमातून सामाजिक कार्य करणाऱ्या समस्त महिलांच्या अस्मितेला व आत्मसन्मानाला असे कृत्य करून ठेच पोहोचवून, स्त्रियांना घृणास्पद वागणुक देऊन अपमानित केलेले आहे. याबाबतची तक्रार राज्य महिला आयोगाच्या मा.अध्यक्षांना व जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांना केलेली असून, शासनाने महिलांचे सक्षमीकरण करून त्यांना सन्मानाने वागणूक देवून, सामाजिक कार्या तील मुख्य प्रवाहात आणण्याचे शासन प्रयत्न करीत असताना, असा महिलांबाबत अनादर करण्याचा हा गैरप्रकार वेंगुर्ला तालुक्यातील रेडी गावातील अटक आरोपींनी केल्याने, रेडी गावास बदनाम करून, महिलांबाबत अश्लील लिखाण करून असा किळसवाणा प्रकार केल्याने खळबळ माजली आहे.

### झोमॅटो बॉय डिलिव्हरीच्या

टिळकनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चार मोबाईल फोन पोलिसांनी ताब्यात घेतले. तसंच गुन्ह्यातील दुचाकी ही ताब्यात घेतली. झोमॅटो डिलिव्हरी बॉयच्या आडून त्याने असे अनेक गुन्हे केल्याचा संशय पोलिसांना आहे.

### ड्रीम 11वर लाख रुपए

तुम्हाला लाखो रुपयांचे बक्षीस मिळणार असल्याची थाप मारली जाते. विशेष म्हणजे, फोनवरून संभाषण करून विश्वास देखील संपादन केला जातो. विशेष म्हणजे, या सायबर भामट्याच्या जाळयात तरुण सतत फसतात. त्यामुळे तरुणांनी अशा फसवणुकीपासून सावधान राहण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## वृद्धांना उन्हाळा अधिक का बाधतो?

वय वाढते तसतशा शरीराच्या विविध जैवरासायनिक क्रिया मंदावतात, हे सत्य आहे. त्याचप्रमाणे उष्ण हवामानाशी लढण्याची शरीराची क्षमता सुद्धा घटत जाते. सभोवतालचे वातावरण उष्ण झाल्यावर त्याविरोधात शरीरामध्ये जे बदल होणे अपेक्षित असतात, तसे ते वयस्कर लोकांमध्ये व्यवस्थित होताना दिसत नाहीत. उन्हाळयाला तोंड देण्यासाठी घामाची निर्मिती होण्याच्या एकंदरच प्रक्रियेमध्ये वृद्धांच्या शरीरामध्ये काही बिघाड झाल्याचे लक्षात येते. आयुर्वेदात म्हटल्याप्रमाणे शरीरामधील उष्णता बाहेर फेकण्याचा सहजसोप्पा मार्ग म्हणजे स्वेद अर्था तघामाची निर्मिती. त्वचेवर घाम निर्मा णकरून त्या घामाचे बाष्पीभवन करण्यासाठी त्वचेखालील रक्तामधील उष्णता वापरली जाते आणि रक्ताला थंडावा मिळतो. यासाठी स्वेद ग्रंथींनी घाम निर्मा ण केला पाहिजे, तर हृदय व रक्त वाहिन्यांनी रक्त अधिक प्रमाणात त्वचेकडे ढकलले पाहिजे.

## तुम्हाला होणाऱ्या वेदनेची तीव्रता कशावर ठरते?

अलीकडील काळात भौतिक उपचारपद्धतीत नव्याने उदयास आलेली संकल्पना म्हणजे पेन न्युरोसायन्स एज्युकेशन किंवा पेन एज्युकेशन. आज मी तुम्हाला या संकल्पनेबद्दल थोड विस्ताराने सांगणार आहे. शरीराच्या ज्या भागात संवेदना आहे त्या भागांच दुखणं म्हणजे वेदना. ही वेदना ठसठसणं, कळ निघणं, टोचल्या सारख वाटणं, चिमटा काढल्यासारख वाटणं या आणि अशा कोणत्याही प्रकारची असू शकते. आता हा प्रश्न पडणं फार स्वाभाविक आहे की, ही वेदना तर वर्षा नुवर्षे आहेच मग त्याबद्दल जागरूकता निर्मा ण करण्याची काय गरज, मुळात 'वेदनेबद्दल जागरूकता' ही संकल्पना का उदयास आली असावी त्याच उत्तर असं की, अनेक प्रभावी औषधं देऊन आणि इतरही बरेचसे उपाय करूनही वेदनेचे काही प्रकार हे अनुत्तरीत राहिले (विशेषतः जुनाट वेदना म्हणजेच क्रॉनिक पेन) यावर संशोधन केलं असता हे लक्षात आलं की 'पेन इज नॉट मीअरली अ सेन्सेशन बट इट इज अ पर्सेप्शन ऑर मोअरओव्हर ॲन एक्सपिरअन्स!' जर वेदना हा एक अनुभव आहे तर साहजिकच तो व्यक्तिनुरूप वेगळा म्हणजेच सबजेक्टिव आहे.

मूलभूत मानवी शारीरिक रचना आणि त्यात होणारे बिघाड हे बऱ्याच अंशी सारखे आहेत पण मग दोन सारख्या वयाच्या, सारखे शारीरिक बिघाड किवा व्याधी असणाऱ्या माणसांमधील वेदनेची तीव्रता वेगळी का आहे? कारण या दोन व्यक्तींची मानसिक, सामाजिक, वैचारिक, कौटुंबिक आणि व्यावसायिक जडणघडण वेगवेगळी आहे. ही जडणघडण त्या व्यक्तिला जाणवणाऱ्या वेदनेची तीव्रता ठरवते आहे. आणि आपले उपचार हे फक्त वेदनेच्या शारीरिक पैलूंपर्यंत सीमित आहेत, साहजिकच ते अपुरे पडताहेत. 'पेन एज्युकेशन इज ऑल अबाऊट ट्रीटिंग अ पर्सन, नॉट ओन्ली द प्रॉब्लेम'. आता हे वेदनेचं शिक्षण द्यायचं म्हणजे नक्की काय कारायचं तर त्याच्या चार पायऱ्या आहेत.

१) वेदना शरीरात नेमकी कशी उद्भवते (पेन फिजिओलॉजी) - वेदना शरीरात कशी उत्पन्न होते, ती आपल्याला कशी जाणवते (पेन फिजिओलॉजी) हे अगदी सोप्या भाषेत (रुग्णाच्या बोलीभाषेत) समजावून सांगितली जाते.

संपादकीय...



# निर्यातीत नन्ना..

शेतीमालाच्या उत्पादनात भारत पहिल्या तीन क्रमांकामध्ये असला, तरी त्याच्या निर्यातीबाबत आपल्याला पुरेशी आघाडी घेता आलेली नाही. याचे कारण स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षांत भारतातील शेतीच्या एकरी उत्पादनात वाढ होऊ शकलेली नाही. जगातील अनेक देशांनी बीटी, जीएम आणि देशी संकरित वाणांच्या साह्याने एकरी उत्पादनात भरीव वाढ केली. भारतासारख्या मोठ्या लोकसंख्येच्या देशात जोवर एकरी उत्पादन वाढत नाही, तोवर शेतमालाच्या विक्रीचे, निर्यातीचे प्रश्न बिकटच राहणार. मागील दोन वर्षांत भारतातून झालेल्या साखरेच्या निर्यातीत सुमारे ६५ टक्के वाढ दिसली. २०१७-१८ मध्ये भारतातून फक्त सहा लाख टन साखरेची निर्यात झाली होती, ती गेल्या वर्षी ११२ लाख टनांवर पोहोचली. या पार्श्वभूमीवर यंदा साखरेच्या निर्यातीस नकारघंटा वाजू लागणे साखर उत्पादकांसाठी अडचणीचेच.

आजमितीस साखरेच्या उत्पादन खर्चापेक्षाही साखरेची विक्री किंमत देशाच्या बाजारपेठेत कमी आहे. त्यामुळे निर्यातीतूनच शेतकऱ्यांच्या हातात चार पैसे अधिक पडण्याची शक्यता असते. मात्र गेल्या वर्षी देशात झालेल्या अतिरिक्त पावसाने, वादळवाऱ्याने उसाच्या शेतीचे मोठे नुकसान झाले, त्यामुळे साखरेचे उत्पादन सुमारे ३० लाख टनांनी घटले. येत्या वर्षांतील पाऊसमानाचा अंदाज पाहता, साखरेच्या उत्पादनात आणखी घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सरकारी गोदामांत शिल्लक असलेली साखर पुढील दोन वर्षे पुरवण्यासाठी निर्यातीला बंदी करण्यावाचून पर्यायच उरलेला नाही. २०२२च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार देशाच्या एकूण अर्थव्यवस्थेत साखर उद्योगाचा वाटा ७.१४ टक्के आहे. साखर उद्योगावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सुमारे पाच कोटी लोकसंख्या अवलंबून आहे. देशाचे सरासरी ऊस उत्पादन ३५.५ कोटी टन असून, सरासरी साखर उत्पादन तीन कोटी टनांच्या आसपास आहे. देशाला एका वर्षाला सुमारे २७० लाख टन साखरेची गरज असते. २०२०-२१मध्ये साखर कारखान्यांनी सुमारे ३५ हजार कोटी रुपयांचा महसूल केंद्र आणि राज्य सरकारला दिला होता. कापड उद्योगानंतर दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा शेती आधारित उद्योग म्हणून साखर उद्योगाकडे पाहिले जाते. पण हा उद्योग नेहमीच राजकीयदृष्ट्या सोयीच्या निर्णयामुळे अडचणीत आला आहे.

देशाच्या लोकसंख्येला पुरेल एवढे अन्नधान्य पिकवताना होणारी दमछाक आणि तरीही डाळी, खाद्यतेल यांसारख्या शेतमालाची मोठ्या प्रमाणात करावी लागणारी आयात यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर मोठा ताण येतो. साखरेसाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची उपलब्धता असावी लागते. बदलत्या हवामानामुळे ती होईलच, याची शाश्वती नाही. अशा वेळी उसाला लागणाऱ्या पाण्याच्या निम्म्याहून कमी प्रमाणात कापसाची शेती करता येऊ शकते. आजही भारत कापडाच्या निर्यातीतील आपले स्थान टिकवून आहे, ते अधिक बळकट करण्यासाठी जे निर्णय तातडीने करावे लागतात, त्याकडे कायमच कानाडोळा केला जातो. फळांच्या निर्यातीलाही अशीच चालना मिळणे आवश्यक असताना, डाळिंब आणि द्राक्षांच्या पिकावर प्लास्टिकचे आच्छादन घालून संरक्षित शेती करावी किंवा नाही, याच्या निर्णयावर गेली काही वर्षे काथ्याकूट सुरू आहे.जगातील काही देश तेथील गरजेपेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात शेतीचे उत्पादन घेतात, ते केवळ निर्यातक्षमता वाढण्यासाठी. ब्राझीलसारख्या देशात उसाची लागवड वर्षांतून तीन वेळा केली जाते आणि गाळप दोन हंगामात केले जाते. त्यामुळे साखर उत्पादनात त्याने जगात आपला पहिला क्रमांक कायम राखला. भारतात वर्षांतून दोन वेळा लागवड आणि एकच गाळप हंगाम असतो. ब्राझीलने आता साखरेपासून इथेनॉल निर्मितीवर भर देऊन साखरेच्या निर्यातीवर बंधने आणली. अशा वेळी भारताला त्या क्षेत्रात संधी मिळू शकते. मात्र, ती हवामानाच्या लहरीपणामुळे गमवावी लागत आहे. यंदा साखर उद्योग आर्थिकदृष्ट्या फायद्यात असला तरी जागतिक बाजारातील तेजीचा फायदा ज्या प्रमाणात मिळायला हवा, तितका तो होताना दिसत नाही. मुळात यंदा हंगाम सुरू होताना जे अंदाज व्यक्त झाले होते ते सपशेल चुकीचे ठरले आहेत. यंदा देशात इथेनॉल निर्मितीसाठी ४५ लाख टन साखरेचा वापर होऊन निव्वळ साखर उत्पादन ३७५ लाख टन होण्याचा अंदाज होता. प्रत्यक्षात देशाचे एकूण साखर उत्पादन ३३० लाख टनांच्या आसपास राहील, असे दिसते. देशातील उसाखालील क्षेत्र ५५ लाख हेक्टरच्या घरात गेले आहे. मागील तीन वर्षांपासून देशात चांगला मोसमी पाऊस होत आहे. त्यामुळे ऊस लागवड क्षेत्रात मागील वर्षी सुमारे तीन टक्क्यांनी वाढ झाली होती. यंदाही सरासरी ५५ लाख हेक्टर इतकेच क्षेत्र होते. मात्र, हवामान बदलाचा परिणाम म्हणून यंदा साखर उत्पादनात सुमारे ३० लाख टनांनी घट झाली आहे. मागील वर्षी देशात ४०८ कोटी लिटर इथेनॉल निर्मिती झाली होती, त्यापोटी कारखान्यांना सुमारे २५,७५० कोटी रुपये मिळाले होते. देशाच्या एकूण इथेनॉल निर्मितीत अन्नधान्यांपासून तयार होणाऱ्या इथेनॉलचा वाटा जेमतेम १६ टक्के आहे. बाकी सर्व इथेनॉल साखर उद्योगाकडूनच पुरविले जाते. आता साखरेच्या कमी उत्पादनामुळे इथेनॉल निर्मितीवरही परिणाम होणे स्वाभाविक आहे.

आजघडीला साखर कारखान्यांना साखर या प्रमुख उत्पादनासह इथेनॉल, क्रॉम्प्रेस्ड बायोगॅस, पोटॅश, सहवीज प्रकल्प, आसवणी प्रकल्प यांसारख्या पोटउपजांची जोड मिळाली असली तरीही कारखान्यांचे आर्थिक गणित आजही साखरेच्याच उत्पादनावर अवलंबून आहे.

# परवडणाऱ्या घरांची अडथळ्यांची शर्यत!

कोणतीही गोष्ट परवडणाऱ्या दरात उपलब्ध व्हावी यासाठी तिची रचना व तंत्रज्ञानामध्ये, तसेच प्रमाणामध्ये सुधारणा करणे महत्त्वाचे असते... इलॉन मस्क

"आपण गृहबांधणीपासून सुरुवात करू शकतो, जो आर्थिक गतिशीलतेचा सर्वात भक्कम पाया आहे. राष्ट्रीय पातळीवरील परवडणाऱ्या घरांसाठीचा कार्यक्रम, दारिद्र्य निर्मुलनाच्या दिशेने केलेला प्रयत्न, मानवी भांडवली गुंतवणूक, सामुदायिक सुधारणा योजना व सार्वजनिक आरोग्य उपक्रम सर्व एकत्रितपणे सुरू करता येतील"... मॅथ्यू डेस्मंड

"चांगली व परवडणारी घरे हा सर्व न्यूयॉर्कवासीयांचा व सर्व अमेरिकन नागरिकांचा मूलभूत हक्क आहे"... निदिया व्हेलाझक्वेझ

तीन लोकांची तीन अवतरणे आणि हे सगळे जण अमेरिकेतील आहेत, ज्या देशात जगातील दर दुसऱ्या व्यक्तीला स्थायिक व्हायची इच्छा असते. मस्क हे अब्जाधीश आहेत, तर डेस्मंड हे अर्थतज्ज्ञ आहेत तर निदिया सामाजिक कार्यकर्त्या आहेत. त्यांच्या शब्दातून त्यांच्या संबंधित क्षेत्राविषयीही समजते, तरीही त्यांच्या अवतरणांमध्ये एक समान धागा आहे तो म्हणजे परवडण्यायोग्य, हा विषय इलॉन मस्क रचना व तंत्रज्ञानातील सुधारणेद्वारे एखादी गोष्ट परवडणारी व्हावी यावर भर देतात तर डेस्मंड राष्ट्रीय आर्थिक प्रगतीसाठी घरे परवडणारी व्हावीत याकडे आपले लक्ष वेधतात, तर निदिया जगाची आर्थिक राजधानी असलेल्या न्यूयॉर्कमध्ये प्रत्येकाला परवडेल असे घर मिळण्याच्या गरजेविषयी आपल्याला सांगतात. हे अतिशय रोचक आहे नाही का, कारण परवडणाऱ्या घरांची काळजी फक्त भारतीयांनाच आहे असे आपल्याला वाटते, परंतु वरील तीन अवतरणे पाहता मला असे वाटते की परवडणारी घरे ही एक



जागतिक समस्या आहे फक्त आपली समस्या नाही!

सर्वप्रथम आपण परवडणारी घरे म्हणजे काय याची व्याख्या केली पाहिजे व त्यानंतरच आपण ती साध्य करण्याचा प्रयत्न करू शकू, असा माझा साधा तर्क आहे. एनसीसीमध्ये मी रायफल शूटिंग शिकायचो तेव्हा सांगितले जायचे, "आधी लक्ष्य पाहा, अंतर मोजा व मग नेम साधा", हाच तर्क परवडणाऱ्या घरांनाही लागू होतो, केवळ नेम साधण्यासाठी, म्हणजेच परिणाम साध्य करण्यासाठी (शेवटचे शब्द उपहासात्मक आहेत.) ते एक लक्ष्य आहे असा आपण विचार केला तरच आपण ते भेदू शकू! मुंबईमध्ये म्हाडाची घरेही अनेक मध्यवर्गीय कुटुंबांच्या आवाक्याबाहेरची आहेत याविषयीच्या बातमीतून या विषयाची सुरुवात झाली.

म्हाडा म्हणजेच महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, ही राज्य सरकारची कंपनी किंवा प्राधिकरण आहे जी राज्यभर, प्रामुख्याने मुंबईमध्ये परवडणारी घरे बांधण्याचे काम करते. काही दशकांपूर्वीपर्यंत ही संस्था उत्तम काम करत होती व अनेक मध्यमवर्गीय तसेच कनिष्ठ मध्यमवर्गीय कुटुंबाचे मुंबई, ठाणे व पुणे या सुवर्ण त्रिकोणात घर घेण्याचे स्वप्न केवळ म्हाडामुळेच साकार होऊ शकले. परंतु अलीकडे या आघाडीवर म्हाडा अपयशी होत असल्याचे दिसत आहे, ज्या वर्गासाठी ही घरे बांधली जातात त्या वर्गाच्या खिशाला ही घरे परवडेनाशी झाली आहेत. यामुळेच आपण जनतेला परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यात अपयशी का ठरत आहोत याचे विश्लेषण करण्याची तीव्र गरज निर्माण झाली आहे. याचे कारण म्हणजे जर मायबाप सरकारच परवडणारी घरे उपलब्ध करून देऊ शकत नसेल, तर खासगी बांधकाम व्यावसायिक ती कशी देऊ शकतील (व त्यांनी का द्यावीत). दुसरा मुद्दा म्हणजे म्हाडा तसेच सिडकोसारख्या संस्था पुरेशी परवडणारी घरे बांधू शकल्या नाहीत (मी हे अपयश म्हणणार नाही), त्यामुळे अनेक शहरांमध्ये रिअल इस्टेटची भरभराट झाली हा मुद्दादेखील विचारात घेतला पाहिजे.

तर, आपल्याला परवडणारी घरे हवी आहेत, तसेच घरांचे दर कमी झाले आहेत (म्हणजे सदनिकांचे प्रति चौरस फूट दर), तरीही विशिष्ट दराच्या घरांची मागणी व तेवढ्या किमतीच्या घरांचा पुरवठा यामध्ये तफावत आहे. तुमचा या विधानाच्या पहिल्या भागावर विश्वास बसत नसेल, तर अनेक उपनगरांमधील भागातील गेल्या पाच वर्षांतील सदनिकांच्या प्रति चौरस फूट दरांची तुलना करणारे विवरण पाहा व स्वतःच तपासून घ्या. घरांचे दर बऱ्यापैकी स्थिर आहेत म्हणजेच घट झाली आहे असेच मानावे लागेल कारण रिअल इस्टेटमध्ये मोठी भांडवली गुंतवणूक करावी लागते. त्यामुळे दशकभरापूर्वीचा कल पाहता, दर न वाढणे म्हणजे घट होण्यासारखेच आहे. आता माझ्या विधानाच्या दुसऱ्या भागाविषयी, आजूबाजूला पाहा व वीस ते पस्तीस वयोगटातील दहा लोकांना विचारा जे शिपाई, चालक, सामानाची डिलिव्हरी करणारी मुले, घरकाम करणाऱ्या बायका, कनिष्ठ लेखा कर्मचारी, बांधकाम स्थळावरील पर्यवेक्षक व लहान संस्थांमध्ये ज्येष्ठ पदावरील कर्मचारी व सरकारी नोकरीतील तृतीय अथवा चतुर्थ श्रेणीतील कर्मचारी, यापैकी किती जणांचे पुण्यामध्ये स्वतःचे घर आहे? दहापैकी तिघांनीही असे उत्तर दिले की त्यांनी स्वतःच्या उत्पन्नातून घर खरेदी केले आहे (त्यांच्या पालकांच्या नव्हे), तर मी पुढील लेखामध्ये परवडणाऱ्या घरांविषयी माझे विचार बदलेन. ज्या प्रकारे ऑटोमोबाइलची बाजारपेठ मारुती डिझायर, ऑल्टो व आयटेन ह्युंदेई यांसारख्या लहान कारच्या जोरावर चालते कारण ग्राहक मध्यमवर्गीय असतात, त्याचप्रमाणे रिअल इस्टेटमध्ये सर्व लोकांना कोटी व त्याहून अधिक किमतीची घरे नको असतात. तसे घर घ्यायला सर्वांना आवडेल, परंतु समाजातील जेमतेम पाच टक्के लोकांना ते परवडू शकते, म्हणूनच आपण परवडणाऱ्या घरांची आधी योग्य व्याख्या केली पाहिजे, त्यानंतरच आपण अशी घरे बांधू शकू.आपल्या देशाची लोकसंख्या दीडशे कोटींहून अधिक आहे, मी योग्य प्रकारे परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यावर का जोर देतोय हे समजून घेण्यासाठी ही तुलना पाहू. तुम्हाला येथे रु. ५ च्या कपापासून ते रु. ५०० च्या कपापर्यंत चहा सहजपणे मिळू शकतो. तुम्हाला एकवेळचे जेवण रु. ३० (पुरी/भाजी) ते रु. १००० प्रति व्यक्ती याप्रमाणे मिळू शकते. तसेच तुम्हाला दुचाकी रु. ३०,०००/- (जी व्यक्ती रु. २०००/- महिना हप्त्याने खरेदी करू शकतो) ते रु. १०,००,०००/- पर्यंत मिळू शकते. हेच चित्र मोबाइल फोनसकट सर्व जीवनावश्यक वस्तूंच्या संदर्भात दिसते. या सगळ्या गोष्टीसुद्धा कायदेशीर आहेत हे लक्षात ठेवा (हा कायदेशीरपणाचा मुद्दा लेखात पुढे येईलच)! आता तुम्ही घराच्या किमती पाहा, तुम्हाला उच्चभ्रू वसाहतीमध्ये टूबीएचके घर २ कोटी रुपयांपर्यंत मिळेल. परंतु वर केलेल्या दरांच्या तुलनेप्रमाणे तुम्हाला रु. ५ लाख किंवा रु. १० लाख एवढ्या किमतीत चांगले घर मिळू शकते का, भले त्या उच्चभ्रू वसाहतीमध्ये नसेल किमान आपण ज्याला घर म्हणू शकू अशा ठिकाणी व राहण्यायोग्य परिस्थितीत मिळेल का? इथे फरक असा आहे की चहा रु. ५ प्रति कप ते रु. ५०० प्रति कपापर्यंत मिळतो, तो कपभर चहा खरेदी करणाऱ्या ग्राहकाची चहा पिण्याची तल्लफ त्यामुळे पूर्ण होते. सेल फोनचे मॉडेल तसेच दुचाकींच्या बाबतीतही असेच आहे, त्यामुळे जे घर १० लाख रुपयांना उपलब्ध आहे त्यातून घर खरेदी करणाऱ्या ग्राहकाच्या मूलभूत गरजा पूर्ण झाल्या पाहिजेत, बरोबर? घर खरेदी करणाऱ्या ग्राहकाच्या मूलभूत गरजा काय असतात, तर त्या अतिशय साध्या आहेत, ते टिकाऊ असावे, वीज, पाणी, कामाच्या ठिकाणापासून तसेच शैक्षणिक केंद्रापासून सहज ये-जा करण्यायोग्य, व त्या खोल्यांच्या भिंतीमध्ये राहणाऱ्या लोकांना हालचाल करण्यासाठी थोडी जागा हवी एवढेच व ते कायदेशीर असावे.

# राजकारणामुळे 'वंदे भारत' निम्म्याच डब्यांची!

नव्या पार्लमेण्ट इमारतीचे उद्घाटन राष्ट्रपतीऐवजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार असल्यामुळे "'वंदे भारत' रेल्वेगाडीच्या प्रत्येक सेवेचेही उद्घाटन मोदीच करतात, तेव्हा रेल्वेमंत्री कोण असा प्रश्न पडतो!'- अशी टीका होते आहे आणि त्यात एवढे मात्र तथ्य नक्की आहे की, आजतागायत ज्या १८ 'वंदे भारत' रुळांवर धावल्या, त्या सर्वांना मोदी यांनीच हिरवा झेंडा दाखवला होता. येत्या १५ ऑगस्टपर्यंत 'आजादी का अमृत महोत्सव' संपण्याच्या आत ७५ 'वंदे भारत' द्रुतगती गाड्या विविध मार्गांवर सुरू व्हाव्यात, अशी योजना आहे आणि त्या सर्व गाड्यांनाही कदाचित पंतप्रधानच हिरवा झेंडा दाखवतील, पण मुद्दा तो नाही. मुद्दा आहे- या ७५ पैकी पुढल्या ५७ 'वंदे भारत' गाड्या पुढल्या अवघ्या ८१ दिवसांत तयार होणार कशा? 'वंदे भारत एक्स्प्रेस' अर्थात 'ट्रेन-१८' चा प्रकल्प २०१७ पासून सुरू झाला आणि फेब्रुवारी २०१९ मध्ये पहिली गाडी पंतप्रधानांचा मतदारसंघ असलेल्या वाराणसीतून नवी दिल्लीपर्यंत धावली. त्यानंतर अहमदाबादसाठी मुंबईहून 'वंदे भारत' सुरू झाली, तर पुढे हिमाचल प्रदेश, राजस्थान, महाराष्ट्र, केरळ आदी राज्यांतही 'वंदे भारत' गाड्या धावू लागल्या. या गाड्यांमध्ये शयनयान नाही, त्यांचा प्रवास फार तर साडेआठ तासांचा आहे. मात्र १६ युनिटच्या या गाडीत मोटरमन केबिनसह एकंदर १४ डबे 'चेअर कार', तर दोन डबे विमानप्रवासाचा अनुभव देणाऱ्या 'एग्झिक्युटिव्ह क्लास'चे असतात... सध्या गाड्यांची मागणी अधिक आणि पुरवठा कमी अशी स्थिती असल्यामुळे १६ ऐवजी अवघ्या आठ डब्यांची - म्हणजे निम्मीच- 'वंदे भारत एक्स्प्रेस' काही मार्गांवर धावते आहे. संपूर्णतः विजेवर चालणाऱ्या पण ताशी १६० कि.मी. पर्यंतचा वेग असणाऱ्या या गाड्यांचा सध्याचा वेग कमी पडतो, या तक्रारीचे एक कारण



म्हणजे डब्यांची ही कमी असलेली संख्या. अर्थात यामागचे राजकारण हे 'वचनपूर्तीचे राजकारण' आहे, असाही दावा करता येईल.

पंतप्रधानांनी गुरुवारी, २५ मे रोजी दिल्लीतून कळ दाबून जिचे उद्घाटन केले, ती 'दिल्ली-डेहराडून वंदे भारत'देखील १६ ऐवजी आठच डब्यांची आहे. तिचा प्रवास सुमारे पावणेपाच तासांचा असेल, परंतु साडेआठ तासांचा प्रवास करणारी 'सिकंदराबाद-तिरुपती वंदे भारत' ही गाडीसुद्धा सुमारे महिनाभर आठच डब्यांनिशी धावत होती. याच प्रवासासाठी गाडीत आणखी आठ डबे गेल्या बुधवारी वाढवण्यात आल्याने ती अपेक्षित १६ डब्यांची झाली आणि ती १५ मिनिटे आधी पोहोचू लागली! असे का झाले?

'इंडियन रेल्वे इन्स्टिट्यूट ऑफ मेकॅनिकल ॲण्ड इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग'(आयआरआयएमई ई) चे प्रा. शीलभद्र दास यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रत्येक 'वंदे भारत' गाडीची रचना ही 'दोन ड्रायव्हिंग ट्रेलर कोच, आठ मोटर कोच, चार ट्रेलर कोच आणि दोन नॉन-ड्रायव्हिंग ट्रेलर कोच' अशी असते. यापैकी 'ड्रायव्हिंग ट्रेलर कोच' म्हणजे मोटरमनची केबिन अधिक ४४ प्रवाशांना बसण्यासाठी जागा असलेले डबे, तर 'मोटर कोच' आणि 'ट्रेलर कोच' हे दोन्ही प्रकार जरी ७८ प्रवाशांसाठी असले तरी त्यातील मुख्य फरक म्हणजे, 'ट्रेलर कोच'ला विजेच्या तारांशी संपर्क ठेवणारा पेन्टोग्राफ असतो, तर 'मोटर कोच'मध्ये गतीसाठी आवश्यक असलेले ट्रॅक्शन मोटर, ट्रॅक्शन कन्व्हर्टर आणि गतिसुरक्षेसाठी अत्यावश्यक असलेला ब्रेक चॉपर रेझिस्टर हे भाग असतात. यापैकी काहीही नसलेल्या 'नॉन ड्रायव्हिंग ट्रेलर कोच'चे रूपांतर प्रत्येकी ५२ आसनांच्या 'एग्झिक्युटिव्ह क्लास'मध्ये करण्यात आले आहे.

गाडी १६ ऐवजी आठच डब्यांची झाल्यावर तिच्यामधील दोन 'ड्रायव्हिंग कोच' वगळता अन्य १४ मधील प्रत्येक प्रकारचे डबे संख्येने निम्मेच झाले. विशेषतः मोटर कोचची संख्या आठवरून चारच झाल्यामुळे वेग कमी होऊ लागला, असे या क्षेत्रातील जाणकारांचे म्हणणे आहे. त्यामुळे 'आयआरआयएमईई' आणि 'रेल अग्रदूत' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'आरडीएसओ' या संस्थांच्या मूळ रचनेप्रमाणे १६ डब्यांचीच 'वंदे भारत एक्स्प्रेस' धावणे इष्ट ठरते. मात्र लवकरात लवकर देशभर 'वंदे भारत'चे जाळे तयार करण्याच्या घाईमुळे सध्या निम्म्याच आकाराच्या गाड्या सोडल्या जात आहेत आणि 'प्रवाशांकडून मागणी वाढल्यावर आणखी डबे जोडले जातात' असे त्याचे समर्थन अनेक प्रसारमाध्यमे करीत आहेत! वास्तविक, सिकंदराबाद ते तिरुपतीसारख्या मार्गावर मागणी आधीपासूनच अधिक होती, तिथे ११२८ ऐवजी ६०८ प्रवासी क्षमता ठेवण्यात काहीच हशील नव्हते.

'लवकरच आपण दर तीन दिवसांत एक 'वंदे भारत' रेल्वेगाडी तयार करण्याइतपत क्षमता गाठू शकू' असे केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी गेल्याच आठवड्यात 'इंडियन एक्स्प्रेस' वृत्तसमूहाच्या 'एक्स्प्रेस अड्डा' या कार्यक्रमात सांगितले होते. आजघडीला गणिती हिशेब मांडून पाहिला, तर "पुढल्या ५७ 'वंदे भारत' गाड्या पुढल्या अवघ्या ८१ दिवसांत तयार होणार कशा?" याचे उत्तर या दाव्यामधून मिळत नाही. दोन वंदे भारत गाड्या- १६ किंवा आठ डब्यांनिशी- तयारच असतील असे जरी मानले तरी ८१ दिवसांत उरलेल्या ५५ गाड्या धावू लागण्यासाठी दर दीड दिवसाला एक गाडी, असा उत्पादनाचा वेग ठेवावा लागेल! नाहीतर १५ ऑगस्टपर्यंत आपण एकंदर ५० 'वंदे भारत' गाड्याच रुळांवर आणू शकू!

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी गेल्या वर्षीचा (२०२२-२३) अर्थसंकल्प मांडताना, पुढल्या तीन वर्षांत ४०० 'वंदे भारत' तयार होणार असल्याचे उद्दिष्ट जाहीर केले होते. ती मुदत मार्च २०२५ अखेर संपेल. प्रत्येक गाडीचा किमान ९७ कोटी रु. उत्पादनखर्च गृहीत धरता ते आर्थिकदृष्ट्याही अशक्यच आहे. मात्र निवडणुकीपूर्वी सर्व राज्यांत किमान एकेक 'वंदे भारत' उद्घाटन घडवून आणण्याचा सत्ताधाऱ्यांचा प्रयत्न राहील... मग गाडी १६ डब्यांची असो की निम्मीच... आठ डब्यांची!

पोलीस बातमी पत्र
संमिश्र
४
मुंबई, मंगळवार ३० मे ते ०५ जून - २०२३

# कांदिवलीचा लालजी पाडा परिसर पुन्हा गोळीबाराने हादरला, 32 वर्षीय तरुणाचा मृत्यू



मुंबई पश्चिम उपनगरातील कांदिवली (Kandivali) पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लालजी पाडा परिसरात गोळीबाराची (Firing) घटना घडली. आज (28 मे) सकाळी 7 वाजून 57 मिनिटांनी ही गोळीबाराची घटना घडली. या घटनेत एका 32 वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला. गोळीबार नेमका कशावरुन झाला हे मात्र अद्याप समजलेलं नाही. गोळीबार करुन आरोपी पसार झाला आहे.

दरम्यान गोळीबाराच्या घटनेची माहिती मिळाल्यानंतर कांदिवली पोलीस घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळाचा पंचनामा करुन पोलिसांनी तरुणाचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठवला आहे. गोळीबाराच्या घटनेमुळे कांदिवली लालजी पाडा परिसरात भीतीचं वातावरण पसरलं आहे. विशेष म्हणजे कांदिवली लालजी पाडा परिसरात मागील सहा ते सात महिन्यांतील गोळीबाराची ही दुसरी घटना आहे.

याआधी 1 ऑक्टोबर 2022 रोजी गोळीबाराची घटना घडली होती. दरम्यान मृत तरुण या परिसरात टँकरने पाणी विक्रीचा व्यवसाय करत होता. याच व्यवसायाच्या वर्चस्व वादातून त्याची हत्या झाल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. कांदिवली पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास सुरु आहे. मागील वर्षी याच परिसरात गोळीबाराची घटना मागील वर्षी ऑक्टोबर महिन्यात कांदिवली पश्चिमेतील लालजी पाडा परिसरात गोळीबाराची घटना घडली होती. परिसरात मध्यरात्री अचानक गोळीबार करण्यात आला. तब्बल चार राऊंड फायरिंग झाली होती. या गोळीबारात एकाचा मृत्यू झाला होता तर अन्य तिघे जखमी झाले होते. मध्यरात्री सव्वाबारा वाजण्याच्या सुमारास गोळीबाराची घटना घडली होती. बाईकवरुन आलेल्या दोघांनी अचानक गोळीबार करण्यास सुरुवात केली. परस्परांमध्ये असलेल्या वादातून गोळीबार करण्यात आला होता. या घटनेची माहिती मिळताच कांदिवली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरु केला. यानंतर पोलिसांनी गोळीबार करणाऱ्या दोन जणांना गुजरातमधून अटक केली होती. अंधेरीत गोळीबार करत हॉटेल मालकाचं अपहरण महिनाभरापूर्वी अंधेरी एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत धक्कादायक घटना घडली होती. मुंबईच्या अंधेरी कुर्ला रोडवरील हॉटेल विरा रेसिडेन्सीचे मालक यांच्यावर गोळीबार झाला होता. अगदी फिल्मी स्टाईलने हा गोळीबार केल्यानंतर गोळीबार करणाऱ्यांनी जखमी झालेल्या हॉटेल मालकाचे इनोव्हा गाडीतून अपहरण केलं होतं. सध्या एमआयडीसी पोलिसांनी गुन्हा दाखल करुन 10 ते 12 वेगवेगळ्या टीम बनवून आरोपीचा शोध सुरु केला. त्यानंतर पोलिसांनी अवघ्या 24 तासात आरोपींना अटक करुन हॉटेल मालकाची सुखरुप सुटका केली होती.

# गुन्हेगाराचे कर्दनकाळ म्हणून ओळख असलेले महेश तरडे यांची सहाय्यक पोलिस आयुक्तपदी बढती



महाराष्ट्र राज्य गृह विभागातर्फेâ कल्याण शहर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश मोहनराव तरडे यांची मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयात सहाय्यक पोलीस आयुक्त पदी पदोन्नतीने पदस्थापना करण्यात आली आहे.

महेश तरडे हे शहर वाहतूक शाखा, कल्याण येथे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पदावर कार्यरत होते. महेश तरडे हे सन १९९२ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची स्पर्धा परिक्षा उत्तीर्ण होऊन पोलीस उप निरीक्षक पदावर भरती झाले. त्यांनी ठाणे पोलीस आयुक्तालयात महात्मा फुले चौक पोलीस स्टेशन, क्राइम ब्रांच खंडणी विरोधी पथक, मुंबई येथे सुरक्षा शाखा, काशीमीरा, भिवंडी (ठाणे ग्रामीण), कळंबोली, तळोजा (नवी मुंबई), तसेच गुन्हे शाखा उल्हासनगर येथे आपल्या उत्कृष्ट कामाने लौकीक मिळवला आहे. तसेच त्यांनी त्यांच्या ३० वर्षा च्या सेवा कालावधीत कल्याण येथील दिपक शेट्टी हत्याकांड, उल्हासनगर येथील शिवसेना कार्यकर्ते गोपाल रजवानी हत्याकांड, अंबरनाथ येथील नगरसेवक प्रसन्न कुलकर्णी हत्याकांड, डोंबिवली येथील केबल व्यावसायिक अनंतपालन हत्याकांड, मुंबई येथील हिरे व्यापारी अश्रफ पटेल हत्याकांड व अशा इतर अनेक गुन्ह्यातील आरोपींना शस्त्रासह अटक करून सदर क्लिष्ट गुन्हे उघडकीस आणले आहेत. खंडणी विरोधी पथकात असतांना सुरेश मंचेकर गँग, छोटा राजन गँग, शेट्टी गँग तसेच इतर गँगस्टरांच्या टोळयां व गुन्हेगारांचे कंबरडे मोडले होते.

## आधार नोंदणीतील नापास मुख्याध्यापकांवर होणार कारवाई

**मुंबई (प्रतिनिधी) :** राज्य शिक्षण विभाग अंतर्गत येणाऱ्या शाळांमधील मुख्याध्यापकांना विद्यार्थ्यांच्या आधार कार्डची माहिती सरल प्रणालीवर अपलोड करण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र अनेक मुख्याध्यापक ही माहिती सादर करण्यास अपयशी ठरल्यामुळे संबंधित मुख्याध्यापकांवर दोषारोप निश्चित करून त्यांची खातेनिहाय चौकशी करण्यात येणार असल्याची माहिती मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागाकडून देण्यात आली. पालिकेकडून आधार कार्ड जोडण्यात अपयशी असलेल्या शाळांची यादी सादर करण्याचे निर्देश शिक्षण निरीक्षकांना दिले आहेत. राज्यातील शाळांमध्ये आधार कार्ड अपडेट करण्याचे काम ९० टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. मात्र मुंबई महापालिका अंतर्गत येणाऱ्या शाळांची परिस्थिती खूप वाईट असल्याचे समजते. त्यामुळे शिक्षण विभागाने शिक्षाधिकाऱ्यांना कारवाईचा इशारा दिला होता. म्हणून पालिकेच्या शिक्षण विभागाने मुख्याध्यापकांना मेमो पाठविले होते. मात्र तरीदेखील आधार कार्ड जोडण्याचे काम संथगतीने सुरू आहे. त्यामुळे आता शिक्षण विभाग आक्रमक झाले असून आता थेट मुख्याध्यापकांची चौकशी करण्यात येणार असल्याचे समजते.

## पुण्याच्या जागेवरून मविआची डोकेदुखी वाढणार?

**मुंबई (विशेष प्रतिनिधी) :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा राज्य विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी रविवारी पुन्हा एकदा पुणे लोकसभा मतदारसंघातल्या उमेदवारीवर राष्ट्रवादीचा दावा ठोकल्यामुळे महाविकास आघाडीतल्या नेत्यांची डोकेदुखी वाढण्याची चिन्हे आहेत. भारतीय जनता पार्टीचे खासदार गिरीश बापट यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या पुणे लोकसभा मतदारसंघात पोटनिवडणूक होण्याची शक्यता आहे.

कालच या मतदारसंघावर आपला दावा सांगताना राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी या भागात कोणाची ताकद किती आहे हे बघूनच महाविकास आघाडीने उमेदवारी निश्चित करावी असे म्हटले होते. यासाठी महापालिका, नगरपालिका, अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तसेच विधानसभा सदस्यांच्या संख्येचा विचार व्हावा आणि मगच महाविकास आघाडीने निर्णय घ्यावा, असे ते म्हणाले होते. त्यावर पलटवार करताना काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मोहन जोशी यांनी, पुण्याची पोटनिवडणूक असू दे किंवा पुढच्या वर्षी होणारी निवडणूक असू दे, पुण्याची जागा काँग्रेसच लढवणार असल्याचे स्पष्ट केले. ही जागा काँग्रेसची होती, आहे आणि पुढेही राहणार असेही ते म्हणाले. दरम्यान राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी यावर महाविकास आघाडीचे नेते एकत्र बसून निर्णय घेतील असे सांगत सगळ्यांनाच अप्रत्यक्षपणे सबुरीचा सल्ला दिला आहे. तुटेपर्यंत कोणीही ताणू नये, असे ते म्हणाले.

# उघड्या मॅनहोलमुळे यंदाही अपघातांचा धोका

## संरक्षक जाळ्या बसवण्याचे काम संथगतीने

मुंबईच्या रस्त्यांवरील उघड्या मॅनहोलचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मुंबई शहर व दोन्ही उपनगरात मलनिस्सारण व पर्जन्य जल वाहिनी विभागाचे मिळून एक लाखांहून अधिक मॅनहोल आहेत. मात्र त्यापैकी ७४ हजार मलनिस्सारण वाहिन्या असलेल्या १,९०० मॅनहोलच्या फ्लडिंग पाईट्सवर, तर शहरातील २५ हजार पर्जन्य वाहिनी असलेल्या तीन हजार मॅनहोलवर संरक्षक जाळ्या बसवण्यात आल्या आहेत. त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यात उघड्या मॅनहोलचा धोका निर्माण झाला आहे.

डॉ. दीपक अमरापूरकर यांचा ऑगस्ट २०१७ मध्ये परळ येथील उघड्या मॅनहोलमध्ये पडून मृत्यू झाला होता. या दुर्घटनेनंतर मुंबईतील मॅनहोलचा प्रश्न ऐरणीवर आला होता. मुंबईत एक लाखांहून अधिक मॅनहोल असून यात पर्जन्य वाहिनी विभागाच्या अखत्यारीत २५ हजार ६००, तर मलनिस्सारण विभागाच्या अखत्यारीत ७४, ६८२ मॅनहोल आहेत. मलनिस्सारण विभागाच्या अखत्यारीत असलेल्या ७४ हजार मॅनहोलपैकी फ्लडिंग पाईट्सजवळ असलेल्या १९०० मॅनहोलवर संरक्षक जाळ्या बसवण्यात आल्याचे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले. त्यामुळे अमरापूरकर यांचा २०१७ मध्ये मॅनहोलमध्ये पडून मृत्यू झाला त्याला सहा वर्षे उलटून गेल्यानंतरही एक लाख मॅनहोलपैकी फक्त पाच हजार मॅनहोलवर संरक्षक जाळ्या बसवण्यात आल्या आहेत. त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यात उघडी मॅनहोल मुंबईकरांसाठी मृत्यूचे दार ठरू शकते.

यंदाच्या पावसाळ्याला काहीच दिवस शिल्लक आहेत. त्यामुळे इतक्या मोठ्या संख्येने असलेल्या मॅनहोलना संरक्षण जाळ्या बसवण्याचे आव्हान पालिकेसमोर आहे. या उघड्या मॅनहोलमुळे पावसाळ्यात रस्त्यावरून चालताना नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला असून तातडीने हे काम पूर्ण करावे अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



| एकूण एक लाख मॅनहोल | मलनिस्सारण विभाग |
| --- | --- |
| पर्जन्य जलवाहिन्या विभाग | शहर - २७,०७८ |
| एकूण मॅनहोल - २५ हजार ६०० | पूर्व उपनगर - १५,९८३ |
| संरक्षक जाळ्या बसवल्या - ३ हजार | पश्चिम उपनगर - ३१,६२१ |
| एकूण मॅनहोल - ७४,६८२ | संरक्षक जाळ्या बसवल्या - १,९०० |

# साकीनाक्यातील खैरानी रस्ता येथील जलवाहिनीचे मजबुतीकरण

मुंबईतील पूर्व उपनगरात एल विभाग हद्दीत, खैरानी रस्ता येथे असलेली सुमारे ८०० मीटर लांब जलवाहिनी ही अत्याधुनिक 'सीआयपीपी' तंत्रज्ञानाचा वापर करून दुरूस्त करण्याचे आव्हानात्मक काम महापालिकेने पूर्ण केले आहे. अरुंद जागेत असलेली ही जलवाहिनी टप्प्याटप्प्याने दुरुस्त केल्याने परिसरातील पाणीपुरवठा सुरळीत ठेवता आला, सोबतच मजबुतीकरण झाल्याने आता या जलवाहिनीची क्षमता आणि आयुर्मान देखील वाढले आहे.

खैरानी रस्ता येथे सुमारे ३० वर्षांपासून असलेल्या भूमिगत १,२०० मिलिमीटर व्यासाच्या जलवाहिनीला (असल्फा आऊटलेट) मागील काही दिवसांपासून गळती सुरू असल्याचे निदर्शनास आले होते. खैरानी रस्ता परिसर अतिशय अरुंद आणि वाहतुकीची वर्दळ असलेला आहे. एवढेच नव्हे तर, एल विभागात संघर्ष नगर, लॉयलका कंपाऊंड, सुभाष नगर, भानुशालीवाडी, यादव नगर, दुर्गामाता मंदीर, कुलकर्णीवाडी, डिसुजा कंपाऊंड, लक्ष्मी नारायण रस्ता, जोश नगर, आजाद मार्केट यासह अनेक परीसराला या जलवाहिनीने पाणीपुरवठा केला जातो. अशा स्थितीत, या जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम सलग हाती घेणे देखील शक्य नव्हते कारण त्यातून परिसरातील रहिवाशांची प्रचंड गैरसाय झाली असती.

या अडचणी असल्या तरी, जलवाहिनीचे पुनर्वसन करण्याशिवाय समोर पर्याय नव्हता. या अनुषंगाने झालेल्या बैठकीत चर्चा केल्यानंतर, जल अभियंता विभागाने

### अत्याधुनिक 'सीआयपीपी' तंत्रज्ञानाचा वापर करून टप्प्याटप्प्याने काम पूर्णत्वास

योग्य त्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा शोध घेऊन त्याचा उपयोग करण्याचे महापालिकेने योजले होते.

जल अभियंता खाते अंतर्गत, उप जल अभियंता (परिरक्षण) उपविभागाने खैरानी रस्ता जलवाहिनीवरून दर शनिवारी याप्रमाणे दहा आठवडे शनिवारी पाणीपुरवठा बंद ठेवून टप्प्याटप्प्याने जलवाहिनी दुरुस्ती काम हाती घेतले. अखेर शनिवारी हे काम पूर्ण झाले.

उप जल अभियंता (परिरक्षण) विभागातील कुशल अभियंता आणि कामगारांनी प्रत्येक शनिवारी सुमारे ८० मीटर लांब जलवाहिनीचे पुनर्वसन, मजबुतीकरण काम केले. अशा प्रकारे सलग दहा शनिवारी काम करून संपूर्ण ८०० मीटर मजबुतीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले. आता या भागातील पाणीपुरवठा सुरळीत असून, नागरिकांची कोणतीही गैरसोय न करता ही मोहीम पूर्ण करण्यात आली.

## कांदिवलीत टँकर व्यावसायिकाची हत्या

**मुंबई :** कांदिवली येथे एका ३२ वर्षीय टँकर व्यावसायिकाची भर रस्त्यात गोळ्या घालून हत्या केली. कांदिवली पश्चिम येथील लालजी पाडा परिसरात रविवारी सकाळी हा धक्कादायक प्रकार घडला. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राथमिक तपासात व्यावसायिक वादातून ही हत्या झाल्याची बाब समोर येत आहे. या घटनेत गोळी लागल्याने तरुणाचा जागीच मृत्यू झाला. गोळीबार केल्यानंतर मारेकरी तत्काळ घटनास्थळावरून पळून गेला. मिळालेल्या माहितीनुसार मृत तरुण या परिसरात टँकरने पाणी विक्रीचा व्यवसाय करत होता. याच व्यवसायाच्या वर्चस्व वादातून त्याची हत्या झाल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. टँकर व्यवसायावर वर्चस्व राखण्यासाठी ही हत्या करण्यात आल्याचे समजते. फरार आरोपीच्या शोधासाठी पोलीस छापेमारी करत आहेत. याप्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

गोळीबाराच्या घटनेमुळे कांदिवली लालजी पाडा परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. विशेष म्हणजे कांदिवली लालजी पाडा परिसरात मागील सहा ते सात महिन्यांतील गोळीबाराची ही दुसरी घटना आहे. याआधी १ ऑक्टोबर २०२२ रोजी गोळीबाराची घटना घडली होती. ऑक्टोबर महिन्यात कांदिवली पश्चिमेतील लालजी पाडा परिसरात गोळीबाराची घटना घडली होती. परिसरात मध्यरात्री अचानक गोळीबार करण्यात आला. तब्बल चार राउंड फायरिंग झाली होती. या गोळीबारात एकाचा मृत्यू झाला होता तर अन्य तिघे जखमी झाले होते.

## मोदींच्या हस्ते ७५ रुपयांच्या नाण्याचे अनावरण

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नव्या संसद भवनाच्या उद्घाटनादिनी टपाल तिकिट आणि ७५ रुपयांच्या नाण्याचे अनावरण केले. आजचा दिवस कायम लक्षात राहावा याकरता हे अनावरण करण्यात आले आहे. भवनाचे उद्घाटन झाल्यानंतर दुसऱ्या टप्प्यातील कार्यक्रमात लोकसभेत सर्व सदस्य स्थानापन्न झाले. यावेळी लोकसभेतील काही सदस्यांनी उपस्थितांना संबोधित केले. तसेच, मोदी यांनीही संबोधित करत या नव्या संसद भवनाचे महत्त्व विषद केले. त्याआधी आजचा हा दिवस सर्वांच्या कायम संस्मरणात राहावा याकरता टपाल तिकिट आणि ७५ रुपयांच्या नाण्याचे अनावरण करण्यात आले.



# 'नवीन संसद भवन' १४० कोटी भारतीयांच्या आकांक्षा आणि स्वप्नांचे प्रतिबिंब : पंतप्रधान

'नवीन संसद भवन ही केवळ एक इमारत नाही, तर १४० कोटी भारतीयांच्या आकांक्षा आणि स्वप्नांचे प्रतिबिंब आहे. तसेच आत्मनिर्भर भारताच्या सूर्योदयाची ही इमारत साक्ष असेल, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. देशाला आज नवीन संसद भवन मिळाले. या नवीन संसदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपले पहिले भाषण केले. ते म्हणाले, 'देशाच्या विकासाच्या प्रवासात काही क्षण अमर होतात. २८ मे हा असाच एक दिवस. नवीन संसद भवन पाहून प्रत्येक भारतीयाचा ऊर अभिमानाने भरून येतो. या वास्तूमध्ये वारसा, वास्तुकला, कला आणि कौशल्य यांचा मिलाफ आहे. यामध्ये संस्कृती आहे, तसेच संविधानाचा आवाज आहे'. नव्या संसद भवनाच्या लोकसभा सभागृहात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सेंगोलची स्थापना करण्यात आली. नरेंद्र मोदी यांनी नव्या संसदेचे लोकार्पण केले. या सोहळ्याला राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शहा, विदेश मंत्री एस. जयशंकर, केंद्रीय सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगमंत्री नारायण राणे, विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री जितेंद्र सिंह, विविध राज्यांचे मुख्यमंत्री आणि भाजप अध्यक्ष जे. पी. नड्डा उपस्थित होते. टाटा प्रोजेक्टस लिमिटेडकडून नव्या संसद भवनाची उभारणी करण्यात आली आहे. या संसद भवनात लोकसभा, राज्यसभा यांसह भव्य संविधान कक्ष, खासदारांसाठी लाऊंज पुस्तकालय, समिती कक्ष, भोजन क्षेत्र आणि पार्किंग व्यवस्था असेल. त्रिकोणी आकाराच्या चार मजली इमारतीचं क्षेत्रफळ ६४ हजार ५०० वर्ग मीटर इतके आहे. या संसद भवनाला तीन प्रवेशद्वार आहेत. त्यामध्ये ज्ञानद्वार, शक्तीद्वार आणि कर्मद्वार आहे. सामान्य व्यक्ती आणि महत्त्वाच्या व्यक्तींसाठी वेगवेगळे प्रवेशद्वार आहेत.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, 'आजचा दिवस देशासाठी शुभ आहे. स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त देश अमृत महोत्सव साजरा करत आहे. या अमृत महोत्सवात भारतातील जनतेने संसदेची ही नवी इमारत आपल्या लोकशाहीला भेट म्हणून दिली आहे. आज सकाळी संसद भवन संकुलात सर्वधर्मीय प्रार्थना झाली, भारतीय लोकशाहीच्या या सुवर्ण क्षणासाठी मी सर्व देशवासीयांना शुभेच्छा देतो. आपले संविधान हाच आपला संकल्प असल्याचे पंतप्रधान म्हणाले. जो थांबतो, त्याचे नशीबही थांबते. जो चालत राहतो, त्याचे नशीबही चालत असते. म्हणूनच चालत राहा. गुलामगिरीनंतर आपल्या भारताने खूप काही गमावून आपला नवा प्रवास सुरू केला. या प्रवासाने अनेक चढ-उतारांवरून, अनेक आव्हानांवर मात करत स्वातंत्र्याच्या सुवर्णकाळात प्रवेश केला आहे'.

'संसदेची नवी इमारत या प्रयत्नांचे जिवंत प्रतीक बनली आहे. हे भवन पाहून प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटतो. असेही ते म्हणाले.

### नवीन भव्य वास्तू आत्मनिर्भर भारताच्या सूर्योदयाची साक्ष असेल...

### ऐतिहासिक भवनाचे मंगलमय वातावरणात लोकार्पण ; सेंगोलची लोकसभेत स्थापना, मोदींनी घातला साष्टांग दंडवत



**होम-हवन, पूजन...** सेंट्रल विस्टा प्रोजेक्ट अंतर्गत ९७० कोटी रुपयांचा खर्च करून नव्या संसद भवनाची निर्मिती करण्यात आली आहे. धार्मिक विधी करत नव्या संसद भवनाचे उद्घाटन करण्यात आले. नव्या संसद भवन परिसरात हवन-पूजन करण्यात आले. सकाळी साडेसात वाजता सुरू झालेल्या सोहळ्याला लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला उपस्थित होते. पंतप्रधान मोदी यांनी व कर्नाटकच्या शृंगेरी मठाच्या पुजाऱ्यांनी वैदिक मंत्रांचा उच्चार केला. यावेळी गणपती होम देखील करण्यात आला. नव्या संसद भवनाच्या उद्घाटन सोहळ्या वेळी नरेंद्र मोदी यांनी श्रमिकांचा सन्मान केला. नव्या संसद भवनाच्या बांधकामात सहभागी असलेल्या कामगारांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सर्वधर्म प्रार्थनेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विविध भाषेत परमात्म्याचे स्मरण करण्यात आले.

### लोकशाही हा आपला संस्कार...

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, 'भारत हा केवळ सर्वात मोठी लोकशाही असेलला देश नाही, तर लोकशाहीची माताही आहे. जागतिक लोकशाहीचाही तो पाया आहे. लोकशाही हा आपला संस्कार, विचार आणि परंपरा आहे. ही नवी वास्तू आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची स्वप्ने साकार करण्याचे साधन बनेल. ही नवीन इमारत आत्मनिर्भर भारताचा सूर्योदय पाहणार आहे. या नवीन इमारतीमुळे विकसित भारताच्या संकल्पांची पूर्तता होणार आहे'.

### राजदंड हे कर्तव्य, सेवेचे प्रतीक...

पंतप्रधान मोदी म्हणाले की, 'चोल साम्राज्यात या राजदंडला कर्तव्य, सेवा, राष्ट्रीय मार्गाचे प्रतीक मानले जात होते. राजगोपालाचारीजींच्या मार्गदर्शनाखाली हा राजदंड सत्ता हस्तांतरणाचे प्रतीक बनले. तामिळनाडूहून खास आलेले अध्यानमचे पुरोहित सकाळी आम्हाला आशीर्वाद देण्यासाठी संसदेत उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली या पवित्र राजदंडाची स्थापना करण्यात आली'.

### नव्या वाटांवर नवे विक्रम होतात...

पंतप्रधानांनी आपल्या भाषणात म्हटले की, नवीन विक्रम हे नवीन मार्गांवर चालल्यानेच निर्माण होतात. नवा भारत नवीन उद्दिष्टे ठरवत आहे. नवा उत्साह आहे, नवा प्रवास आहे. नवा विचार, नवी दिशा, नवी दृष्टी, नवीन संकल्प, नवीन विश्वास आहे.

### राजदंड नवीन संसदेत स्थापित

दरम्यान, पंतप्रधान मोदींनी आज नवीन संसद भवनाचे उद्घाटन केले. काही विरोधी पक्षांनी या उद्घाटन कार्यक्रमाला विरोध करत या कार्यक्रमावर बहिष्कार टाकला. तामिळनाडूच्या अध्यानम पुरोहितांनी विधीवत पूजा केली. पंतप्रधान मोदी आणि लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला पूजेला बसले होते. धार्मिक विधीनंतर पुरोहितांनी राजदंड पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे सुपूर्द केला, जो नवीन संसद भवनात स्थापित करण्यात आला आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत).संपर्कः-9594418181 / 8424989898